मुंबई आणि मुंबई उपनगरामध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत आहे. त्यामुळे भविष्यात रुग्ण वाढल्यास खबरदारीचा उपाय म्हणून महाराष्ट्र सरकारच्या वतीने दहीसर चेक नाका येथील मोकळया जागेवर कोरोना रुग्णांकरिता ८८० बेडचे फिल्ड रुग्णालय उभारण्यात येत आहे. या रुग्णालयात आयसोलेशन (अलगीकरण) व ११० बेडसाठी ऑक्सिजनची सुविधा करण्यात येणार आहे. मुंबई मेट्रो रेल्वे कार्पोरेशनच्या वतीने या रुग्णालयाची उभारणी सुरू असून येत्या ८ दिवसांत हे काम पूर्ण होणार आहे. शिवसेना आमदार विभागप्रमुख विलास पोतनीस यांनी रविवारी या कोरोना रुग्णालयाची पाहणी केली आणि कामाचा आढावा घेतला. यावेळी शिवसेना नगरसेवक बाळकृष्ण ब्रीद, एमएमआरसीचे अधिकारी राजेश पाटील, सचिन अहीर, राजदूरकर आदी उपस्थित होते.

